# लोक महाविद्यालय, वर्धा

## वार्षिक **नमुना प्रश्नपत्रिका**

विषय :- आवश्यक मराठी

वर्गः- बी.ए. भाग २ (सेमिस्टर ४)

वेळः- ३ तास गुण : ८०

---

सूचना :- १) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहेत.

२) सर्व प्रश्नांना समान गूण आहेत.

प्र. १ला ' नवी पहाट उगवत आहे' या पाठातून निर्मलकुमार फडकुले यांनी कोणता आशावादी दृष्टीकोन व्यक्त केला आहे? (१६)

किंवा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नव्या भारताचे युग पाहात होते याची जाणीव बा.ह. कल्याणकर यांनी कशी करुन दिली आहे?

प्र. २रा 'मृत्यु' हेच अंतिम सत्य आहे याची जाणीव सुरेश भट यांनी 'स्मरण' या कवितेतून कशी करुन दिलेली आहे? (१६)

किंवा

'न्यायासाठी' या कवितेतून कुसुम आलाम यांनी न्यायव्यवस्थेच्या संदर्भात कोणते मार्मिक भाष्य केले आहे?

प्र. ३रा पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी १०० शब्दात लिहा. (१६)

गट ' अ'

क) दुर्गा भागवत यांनी माघ महिन्याचे अत्यंत लालित्यपूर्ण वर्णन कसे केले थोडक्यात सांगा.

ख) जयंत नारळीकरांचा वैज्ञानिक दृष्टिकोन कसा दिसून येतो?

ग) नारायण सुर्वे यांच्या मनात संघर्षाची चिंगारी कशी प्रज्वलित होते?

घ) ना.धो. महानोर यांच्या शेतातल्या निसर्गाशी सगळया वृत्ती कशा तादात्म्य पावल्या?

गट 'ब'

च) तपस्वीच्या त्यागी व करुणामय व्यक्तिमत्वाचे विविध पैलू थोडक्यात सांगा.

छ) अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे असे डॉ. आंबेडकर का म्हणतात?

ज) वंचितांच्या वाटयाला आलेल्या दुःखाचा कारुण्यमय स्वर 'डोळे' या कवितेने कसा छेडला आहे?

झ) संघर्ष हा केवळ आथिक पातळीवरचा नसून तो सामाजिक -सांस्कृतिक होतो असे नारायण सुर्वे का म्हणतात?

प्र. ४था पुढीलपैकी कोणत्याही एकाच गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे १०० शब्दात लिहा. (१६)

गट 'क'

त) भाषांतराची पूर्वतयारी कशी करावी लागते?

थ) मुलाखत लेखनाचे तंत्र सांगा.

द) मुलाखत म्हणजे काय? मुलाखत कोणाची घेतली जाते?

ध) भाषांतर म्हणजे काय? हे सांगून भाषांतराचे प्रकार सांगा.

गट 'ख'

प) भाषांतराचे स्वरुप सांगून त्याची आवश्यकता सांगा.

फ) वृत्त - भाषांत सांगा.

ब) मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीने मुलाखत घेण्यापूर्वी कोणती तयारी करावी लागते?

भ) 'मुलाखत हे व्यक्तीला समजून घेण्याचे एक माध्यम होय' थोडक्यात सांगा.

प्र ५वा सर्व प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (१६)

१) तपस्वीचा परोपकारी स्वभाव थोडक्यात सांगा.

२) 'नवी पहाट उगवत आहे ' असे लेखक का म्हणतात?

३) 'संपली माझी प्रतिक्षा, गोठली माझी अपेक्षा—
कापलेले पंख माझे —— लोचने आता मिटावी ! या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.

४) मानवी जीवनाचे दुःख भाऊ पंचभाई यांना कसे दिसले ?

५) भाषांतराचे महत्वाचे कार्य थोडक्यात सांगा.

६) लक्ष्यनिक भाषांतर थोडक्यात सांगा.

७) मुलाखत कोणकोणत्या निमित्ताने घेतली जाते? ते प्रसंग सांगा

८) मुलाखतीची यशस्विंता ही कशावर अवलंबून असते?